आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ९२ वा ● शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचे आर्थिक चित्र बदलणार – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

पालघर, (जिमाका) : देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासात मच्छिमार बांधवांचे मोठे योगदान आहे. वाढवण बंदर जगातील सर्वात खोल व मोठ्या बंदरांपैकी एक महत्त्वपूर्ण बंदर होणार आहे. या प्रकल्पामुळे या परिसराचे आर्थिक चित्र बदलणार आहे. आता हा परिसर रेल्वे व महामार्गांशीही जोडला जाणार असून यामुळे या परिसरात नवनवीन व्यापार सुरू होतील. या बंदराचा लाभ महाराष्ट्राबरोबरच या भागातील स्थानिकांना व त्यांच्या पुढील पिढ्यांना होणार आहे, असे प्रतिपादन देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले. सुमारे ७६,२०० कोटी रुपये खर्चाच्या वाढवण बंदराचा पायाभरणी समारंभ तसेच १५६३ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्प व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पालघरमधील सिडको मैदानात आयोजित कार्यक्रमात झाले.

## ५३ मोकाट जनावरे गोशाळांकडे वर्ग, २२ पशु मालकांकडून ९४ हजारांचा दंड वसूल

लातूर, प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम हाती घेण्यात आली होती.या मोहिमेत पालिकेने पकडलेल्यांपैकी ५३ मोकाट जनावरे विविध गोशाळांकडे वर्ग करण्यात आली असून २२ पशु पालकांनी दंड भरून आपापली जनावरे परत नेली आहेत.

शहरातील रस्त्यावर गाय, बैल,म्हैस,रेडा,गाढव,शेळी व इतर लहान–मोठी जनावरे भटकत असत. ही मोकाट जनावरे पकडण्यासाठी महापालिकेच्या वतीने अशोक स्वच्छता सेवा मंडल यांच्यामार्फत धडक मोहीम हाती घेण्यात आली होती.या अंतर्गत दिनांक २८ ऑगस्ट पर्यंत पालिकेने ९८ जनावरे पकडून सिकंदरपुर येथे कोंडवाड्यात बंदिस्त केली होती.

या मोहिमे संदर्भात पालिकेने पशुपालकांना यापूर्वीही विविध माध्यमातून सुचना केल्या होत्या. जनावरे पकडल्यानंतर २२ पशुपालकांनी ९४ हजार ५०० रुपयांचा दंड भरून आपापली जनावरे परत नेली.५३ जनावरांचे मालक न आल्याने ती बेवारस म्हणून घोषित करण्यात आली होती.ही जनावरे अटींची पूर्तता करणाऱ्या तीन गोशाळांना कायमस्वरूपी संगोपन करण्यासाठी देण्यात आली आहेत. पालिकेकडे सध्या १२ मोकाट जनावरे शिल्लक आहेत.

मनपाच्या वतीने मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम अद्यापही सुरू आहे.त्यामुळे शहरातील पशुपालकांनी आपापली जनावरे रस्त्यावर मोकाट सोडू नयेत.अन्यथा याच पद्धतीची कार्यवाही केली जाईल,असा इशारा पालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

## ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरणासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदत

मुंबई, : ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. ज्या वाहन चालकांनी मानवी स्वरूपात अनुज्ञप्ती प्राप्त केली आहे. अशा वाहन चालकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत अनुज्ञप्तीचे (ड्रायव्हींग लायसन्स) संगणक प्रणालीद्वारे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर यांनी केले आहे. १५ सप्टेंबरनंतर मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरण केले जाणार नाही याची अनुज्ञप्ती धारकांनी नोंद घ्यावी. मुंबई (मध्य) ताडदेव येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) परिसरात कार्यालयीन इमारतीचे बांधकाम, आय एड सी सेंटर, वाहन चालक प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम होणार आहे. या कार्यालयाकडून नोव्हेंबर २००६ पूर्वी जारी करण्यात आलेल्या सर्व अनुज्ञप्ती धारकांना अनुज्ञप्ती मानवी स्वरूपातच आहे. अशा अनुज्ञप्ती धारकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत या कार्यालयामध्ये येऊन आपले अनुज्ञप्तीचे संगणक प्रणालीमध्ये बॅकलॉग करून घ्यावे. व मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्माट कार्डमध्ये रूपांतरण करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

## गुजरात आणि महाराष्ट्र सांस्कृतिक आदान प्रदानाचा उद्या सांगीतिक कार्यक्रम

मुंबई, : सांस्कृतिक कार्य विभाग अंतर्गत महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी मार्फत लोकायन सांस्कृतिक संस्था, मुंबई यांच्या सहकार्याने 'गप्पा लोककलेच्या, महाराष्ट्र आणि गुजरातच्या' (वातो लोककलानी, महाराष्ट्र अने गुजरातनी) या लोककलांच्या अभ्यासात्मक आणि सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समाज कल्याण हॉल, सी.एस. रोड, दहिसर (पूर्व) येथे शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी, सायंकाळी ६ वा. आयोजित कार्यक्रमात डॉ. मोनिका ठक्कर लिखित 'भुलजा भुलाबाई के लोकगीतों का उद्देश और अर्थ' या पुस्तकाचे लोकार्पण होणार आहे. तसेच महाराष्ट्रातील लोककलांविषयी डॉ. मोनिका ठक्कर लोककला अकादमी मुंबई विद्यापीठ तर गुजरातच्या लोककलांविषयी राजकोट विद्यापीठ, गुजरातचे डॉ. दीपक पटेल मार्गदर्शन करतील. महाराष्ट्रातील लोकगीतांचे सादरीकरण डॉ. शिवाजी वाघमारे आणि वृंद तर गुजरातच्या लोकगीतांचे सादरीकरण धानी चारण करणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन भागवत कथाकार मिनाबेन जोशी यांच्या हस्ते तसेच पुस्तकाचे लोकार्पण प्रा. सुरेंद्र तन्ना यांच्या हस्ते होणार आहे.




## भगिनींचा सन्मान, तिच्या हक्काचे रक्षण आणि विकासासाठी तिच्या खंबीरपणे पाठीशी उभा – आ अभिमन्यू पवार

औसा – सरकार आपली काळजी करत आहे. महिला सक्षमीकरणासाठी या सरकारने अनेक योजना सुरू केल्या आहेत. एकंदरीत स्त्रीच्या पुर्ण आयुष्याची जबाबदारी या सरकारने घेतली आहे.सरकारच्या या विविध योजनेच्या बरोबर मतदारसंघातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गटाच्या माध्यमातून अंडी संकलन उद्योग व रेशीम उद्योगाशी भगिनींना जोडण्याचा आपला प्रयत्न असून भगिनींला सन्मानाने वागवावे तिच्या हक्काचे रक्षण करावे आणि तिच्या विकासासाठी आपले योगदान द्यावे हे माझे कर्तव्य असल्याची भावना आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केली आहे.



रक्षाबंधन हा आपल्या भारतीय संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे. जो केवळ बंधुत्वाचा नात्याला साजरा करीत नाही तर प्रेम, विश्र्वास आणि संरक्षणाची भावना जागृत करतो.या भावनेने आ अभिमन्यू पवार यांचे औक्षण करत राखी बांधण्यासाठी (दि.३०) ऑगस्ट रोजी मतदारसंघातील कासारसिरसी येथे शेकडो लाडक्या बहिणींने गर्दी केली होती. यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले की मतदारसंघातील भगिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीने माझी बहिण सुरक्षित या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक घरातील गॅस दुरुस्ती एका चमुव्दारे केली जात आहे. अगदी मोफत गॅस दुरुस्ती केली जात असताना गॅस च्या वापराबद्दलही या चमू कडून आपणास मार्गदर्शन केले जात आहे. याचबरोबर पाण्यासाठी भगिनींची हेळसांड होवू नये यासाठी प्रत्येक गावात सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांसाठी स्वतंत्र रोहित्र उपलब्ध करून देण्यात आली आहे. जेणेकरून पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येऊ नये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत असताना सामाजिक कार्याच्या दुष्टीने मतदारसंघातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबासाठी मोफत शिलाई मशीन वाटप करण्यात आल्या जेणेकरून त्या कुटुंबाला त्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होईल. सरकारने भगिनींना अनेक योजनांच्या माध्यमातून सक्षमीकरण करण्याचे काम सुरू केले असून सुकन्या योजना, मुलीचे मोफत शिक्षण योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, संगायो व इंगायो योजनेतून मानधनात वाढ आदीसह एसटी बस मध्ये प्रवास रक्कमेत पन्नास टक्के सुट महिला बचत गटातील मानधनात वाढ यासह अनेक योजना सुरू केल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

याप्रसंगी आ पवार यांनी आपल्या मुलींना उच्च शिक्षण देण्याचा आग्रह उपस्थित भगिनींना बोलून दाखवली तसेच राजमाता जिजाऊ शाळा माझी न्यारी उपक्रमाअंतर्गत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे धोरण आखून मतदारसंघातील शाळांमध्ये अद्ययावत शिक्षण देण्यासाठी शाळा अद्ययावत केल्या जात असून लामजना, कासारसिरसी व बोरफळ या शाळेतील काम या योजनेअंतर्गत पुर्ण झाल्याघे त्यांनी सांगितले.याप्रसंगी मोठ्या संख्येने महिला भगिनीं उपस्थित होत्या...

## महाराष्ट्रातील महिला सशक्तीकरण व महिला अधिकाऱ्यांचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून कौतुक

पालघर, (जिमाका): महिला विकास व नारी सशक्तीकरणात महाराष्ट्र हा देशाला दिशा देण्याचे काम करत असल्याचे सांगून राज्यातील महत्त्वाच्या पदांवर असलेल्या महिला अधिकाऱ्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले.




पालघर येथे आयोजित वाढवण बंदराच्या पायाभरणी समारंभात प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी राज्यातील महिला सशक्तीकरण व महिला अधिकाऱ्यांचे जाहीर सभेत कौतुक केले. श्री. मोदी म्हणाले की, महाराष्ट्रातील अनेक उच्च पदांवर महिला अधिकारी अतिशय सक्षमपणे शानदार काम करत आहेत. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच मुख्य सचिवपदी सुजाता सौनिक या राज्यातील प्रशासनला मार्गदर्शन करत आहेत. पहिल्यांदाच राज्याच्या पोलीस महासंचालकपदी रश्मी शुक्ला या नेतृत्व करत आहेत. पहिल्यांदाच राज्याच्या वन संरक्षण बलाच्या प्रमुखपदी सौमिता बिश्र्वास नेतृत्व करत आहेत. राज्याच्या विधी विभागाच्या प्रमुख म्हणून सुवर्णा केवले या जबाबदारी सांभाळत आहेत. राज्याच्या प्रधान अकाऊंटंट जनरलपदी जया भगत यांनी तर मुंबईतील कस्टम विभागाची धुरा प्राची स्वरूप सांभाळत आहेत. तर मेट्रो तीनचे नेतृत्व व्यवस्थापकीय संचालक अश्र्विनी भिडे करत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

तसेच उच्च शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्रातही महिला नेतृत्व करत असल्याचे सांगून महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर आणि पहिल्या कौशल्य विकास विद्यापीठाच्या पहिल्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर यांचा गौरवपूर्ण उल्लेख प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी केला.

अशा अनेक महत्त्वाच्या मोठ्या जबाबदारीच्या पदांवर महाराष्ट्रातील नारीशक्ती उत्कृष्ट कार्य करत आहे. विसाव्या शतकातील नारीशक्ती समाजाला नवी दिशा देण्यासाठी तयार आहे. ही नारीशक्तीच विकसित भारताचा मोठा आधार असल्याचेही प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी सांगितले.

## मुल्याधिष्ठित ज्ञान मिळविताना माणूसपणही जपा – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

अमरावती, (जिमाका) : अन्य देशांच्या तुलनेत आपल्या देशात पारिवारिक जीवन जपल्यामुळे संस्कारशील समाजरचना आजही कायम आहे. नवतंत्रज्ञानाच्या सहाय्याने आपापल्या क्षेत्रात मुल्याधिष्ठित ज्ञान मिळवितानाच माणूसपणही जपा. अर्थार्जन करताना उत्तम नागरिक म्हणून आपली कर्तव्ये पाळा, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. नेमाणी गोडाऊन समोरील सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग टेक्नॉलॉजीच्या रौप्य महोत्सवी सोहळ्याचा समारोपीय सोहळा विद्यालयाच्या स्व. अरविंदजी उर्फ भाऊ लिमये सभागृहात आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी मार्गदर्शन करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी बोलत होते. सिपना प्रसारक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष जगदीश गुप्ता, प्राचार्य संजय खेरडे यावेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, सिपना प्रसारक शिक्षण मंडळ रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. आजवर येथे कितीतरी विद्यार्थी घडले. ज्ञानामुळेच माणसाची किंमत वाढते. शोध, कौशल्य, ज्ञान यांचे रुपांतरण तुमच्या कार्यात केल्यास निश्र्चितच प्रगती होते. प्रत्येक व्यक्तीकडून शिकण्यासारखी बाब असते, ती तेवढी शिकून घ्या. आयुष्यात अर्थार्जन करीत असताना ज्ञान, संशोधन, तंत्रज्ञान यांचे नवनवे प्रयोग करीत रहा. सुरक्षिततेपेक्षा धोके पत्करायला शिका. कोणतेही नवीन कार्य करताना तुमची इच्छाशक्ती खूप महत्त्वपूर्ण आहे.

## वानवडा, शिंदाळा आणि येल्लोरी ग्रामस्थांशी संवाद साधून आ. कराड यांनी जाणून घेतल्या अडीअडचणी

**लातूर – लातूर ग्रामीण मतदार संघातील भादा सर्कल मधील मौजे वानवडा, शिंदाळा आणि येल्लोरी येथील ग्रामस्थांशी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी शुक्रवारी सकाळी संवाद साधला, महायुती शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेबाबत चर्चा करून अडीअडचणी जाणून घेतल्या. आमदार साहेबांनी गावात येऊन जनतेचे प्रश्न समजून घेतले काही प्रश्न तिथेच निकाली काढण्याचा प्रयत्न केला यामुळे तिन्ही गावातील नागरिकाकडून समाधान व्यक्त केले जात आहे.**



भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत जाऊन नागरिकांशी चर्चा करण्यासाठी संवाद अभियान सुरू केले आहे या अभियानांतर्गत शुक्रवारी सकाळी वानवाडा शिंदाळा आणि येल्लोरी या तीन गावांना भेटी देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. वानवडा येथील ९२ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाची भूमिपूजन केले तर ६८ लाख रुपये खर्चाच्या झालेल्या विकास कामाचा लोकार्पण असे एकूण १ कोटी ६० लाख रुपये खर्चाच्या विकास कामाचा आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी त्यांच्या समवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, जिल्हा उपाध्यक्ष पद्माकर चिंचोलकर, रवी पाटील, महादेव मुळे, गुणवंत कारंडे, सतीश कात्रे, वाजिद पठाण यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

लातूर ग्रामीण मतदार संघातील प्रत्येक गावात कमीत कमी ५० लाख आणि जास्तीत जास्त ५ कोटी रुपये विविध विकास कामासाठी निधी मिळून दिला याचे मला समाधान आहे. गेल्या १५ वर्षात या भागातून निवडून गेलेल्या काँग्रेस आमदारांनी काय विकास केला, कुठल्या योजनेला निधी आणला असा प्रश्न उपस्थित केला.

## अविनाश पाटील यांचे लंडन येथे तबला वादन

( पंढरपूर)– येथील युवा पिढीतील प्रसिद्ध तबला वादक अविनाश पाटील यांच्या सोलो तबला वादनाच्या मैफिली युके देशातील लंडन, न्यु कॅसल, रेडिंग तसेच आयर्लंड देशातील डबलीन येथे होणार आहेत. येथील विविध महाराष्ट्र मंडळे, सांकृतिक संस्था यांच्या तर्फे दिनांक ६ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर दरम्यान त्यांच्या तबला वादनाच्या मैफिलींचे आयोजन करण्यात आले आहे. पाटील यांनी तबला वादनात संगीत अलंकार पदवी व एम. ए .तबला वादनात पुणे विद्यापीठचे सुवर्णपदक प्राप्त केले आहे.



पाटील यांनी तबल्याची तालीम त्यांचे वडील कलापिनी संगीत विद्यालयाचे संचालक व प्रसिद्ध तबला वादक गुरु पं. प्रमोद पाटील व दिल्ली घराण्याचे ख्यातनाम तबला वादक पं. उमेश मोघे यांचे कडे घेतली आहे. अतिशय प्रतिकुल परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी

व मेहनतीच्या जोरावर प्रचंड संघर्ष व कष्ट करुन त्यांनी स्व–कर्तुत्वावर स्व:ताची वेगळी ओळख संगीत विश्र्वात निर्माण केली आहे. पद्मभूषण पं. राजन– साजन मिश्रा यांच्या सारख्या जागतीक ख्यातीच्या अनेक कलाकारांना त्यांनी साथ संगत केली आहे, तसेच सवाई गंधर्व संगीत महोत्सवासह देशात व परदेशातील रसिकांची त्यांनी दाद मिळवली आहे . ग्रामीण भागात जन्मलेल्या पाटील यांनी अपार मेहनतीने संगीत क्षेत्रात यश संपादन केले आहे.

## सौ.दीपशिखा धिरज देशमुख यांनी घेतली जिल्हाधिकारी सौ.वर्षा ठाकूर-घुगे व मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांची सदिच्छा भेट.

लातूर / प्रतिनिधी :–– ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जे




दार शिक्षण मिळावे यासाठी जिल्हा परिषद व विविध संस्था अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या शाळांमधील शिक्षक खुप चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देत आहेत. या अनुषंगाने विद्यार्थी व शिक्षक यांच्या साठी सामाजिक भावनेतून काय अधिक चांगले कार्य करता येईल याविषयी रीड लातूर उपक्रमाच्या संस्थापक सौ.दीपशिखाताई धिरज देशमुख यांनी लातूरच्या जिल्हाधिकारी सौ.वर्षा ठाकूर–घुगे मॅडम व लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अनमोल सागर सर यांची सदिच्छा भेट घेऊन चर्चा केली.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये पुस्तक वाचनाची आवड निर्माण व्हावी, इंग्रजी भाषाज्ञान व्हावे, व्यक्तिमत्व विकास व्हावा, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'रीड लातूर' उपक्रमाला लातूरमध्ये चांगला प्रतिसाद मिळत आहे. शालेय स्तरावर राबविण्यात येत असलेल्या 'रीड लातूर' या पुस्तक वाचन उपक्रमाचे जिल्हाधिकारी मॅडम यांनी कौतुक केले.सध्याच्या काळात पुस्तक वाचन करणे ही गरज बनली आहे. पुस्तक वाचनाचे महत्त्व अनन्यसाधारण असून प्रत्येक कुटूंबात पुस्तके वाचनाच्या दृष्टीने विचार होवून त्यातून लुप्त होत चाललेली वाचन संस्कृती जोपासण्यासाठी चालना मिळेल अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या रीड लातूर उपक्रमास खुप चांगला प्रतिसाद मिळत असून इंग्रजी भाषेविषयी विद्यार्थ्यांच्या मनात असलेली भिती दूर होवून मोठ्या आत्मविश्र्वासाने विद्यार्थी इंग्रजी पुस्तकांचे वाचन करत आहेत.जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या सहकार्याने सुरू असलेला रीड लातूर उपक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी कटिबद्ध असल्याचे रीड लातूरच्या संस्थापक सौ. दीपशिखाताई धिरज देशमुख यांनी सांगितले. यावेळी रीड लातूर उपक्रमाचे समन्वयक राजू सी पाटील यांनी रीड लातूरच्या आज पर्यंतच्या वाटचालीची माहिती जिल्हाधिकारी मॅडम व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी सरांना अवगत करून दिली.

## टॅक्स सवलतींचा आज शेवटचा दिवस जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे

लातूरप्रतिनिधी: कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिका मार्फत वर्षाच्या सुरुवातीस नियमितपणे कर भरणारे मालमत्ता धारकासाठी विविध सुट/सवलती देण्यात आले आहेत. त्यानुसार ३१ ऑगस्ट पर्यंत मालमत्ता कर भरणा–यास भरणाऱ्यास विविध सवलती देण्यात आली होती. सदरील योजनेस मालमत्ताधारकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून ३१ ऑगस्ट ही शेवटची तारीख आहे . चालू वर्षात जवळपास २१००० हून अधिक मालमत्ता धारकाणी टैक्स सवलतींच्या लाभ घेऊन २५ कोटी ची विक्रमी वसुली कर आकारणी व कर संकलन विभागाने केली आहे. त्यानुसार शेवटच्या दिवशी सुट्टी असली तरी नागरिकांच्या सोयीसाठी सर्व क्षेत्रीय कार्यालये सुरू ठेवण्याचा निर्णय प्रशासणाने घेतला आहे . १ सप्टेंबर पासून मात्र मालमत्ता धारकना २% विलंब शुल्क आकारले जाणार असून सोबतच कर वसुली करीता मालमत्ता जप्ती, नळखड आदि सक्तीच्या कार्यवाही करण्याचे नियोजन कर विभागामार्फत केले आहे. तरी उद्या टैक्स सवलतीचा शेवटचा दिवस असून अधिकाधिक मालमत्ताधारकानी टैक्स भरणा करून सूट चा लाभ घ्यावा व सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# विज्ञान मेळावा म्हणजे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना चालना कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे

लातूर : शैक्षणिक क्षेत्रामध्ये लातूर पॅटर्न हा सर्वपरिचित आहे परंतु अलीकडे सांस्कृतिक क्षेत्रामध्ये सुद्धा लातूरने एक वेगळा ठसा उमटवलेला आहे. शासनातर्फे तालुका, जिल्हा आणि विभागस्तरीय नाट्योत्सव स्पर्धा घेण्यात येत आहे यामध्ये विद्यार्थ्यांमधील कलागुणांना चालना मिळते आणि त्यांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये वाढ घडून येते असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे यांनी केले



विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर आणि श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूरच्यावतीने विभागस्तर विद्यार्थी विज्ञान मेळावा आणि विभागस्तर विज्ञान नाट्योत्सव २०२४ उद्घाटन कार्यक्रम महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात जगतज्योती महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वनाने झाली. यावेळी महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, पठाण एस.एम, प्रा. परमेश्र्वर पाटील, परीक्षक प्रा. विश्र्वनाथ स्वामी, प्रा. संदिपान जगदाळे, प्रा. सुशील कोरे प्रा. ज्ञानोबा आव्हाड, प्रा. कोमल गोमारे आणि प्रा. शिवलिंग नागापुरे उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रदीप दिंडेगावे म्हणाले की, जिल्हा परिषद, शिक्षण विभाग लातूर आणि शिक्षण विभागीय उपसंचालक कार्यालय, लातूर यांच्याद्वारे आमच्या महाविद्यालयातील सभागृहांमध्ये तालुका, जिल्हा आणि आता विभागस्तरीय स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी दिल्याबद्दल त्यांनी सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सहभागी स्पर्धकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक शिवलिंग नागापुरे यांनी केले. शुभेच्छापर मनोगत विस्तार अधिकारी थेटे, गटशिक्षणाधिकारी व्यवहारे, काजी, यांनी विद्यार्थ्यांना याप्रसंगी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था आणि महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय गुणवान व गुणवंत विद्यार्थ्यांचा सदैव कौतुक करत असतो. त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी व तसेच कलागुणांच्या प्रदर्शनासाठी आग्रही भूमिका घेऊन त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देत असतो. या शिक्षण संस्थेचं आणि महाविद्यालयाच एकच उद्देश आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडून आणणे.

या कार्यक्रमांमध्ये पोवाडा सादर करून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह वाढविण्याचं कार्य प्रा. डॉ. संदिपान जगदाळे यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. घनश्यगाम ताडेवार यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी डावकरे, संगमेश्र्वर मुळे, बिराजदार गुरुप्रसाद, सय्यद जलील यांनी प्रयत्न केले.

# जिल्हा नियोजन अधिकारी श्री सोमनाथ रेड्डी यांनी दिला खेळाडूंना दिला गुरूमंत्र

लातूर : महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्मीती करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी प्रमाणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत मेजर ध्यानचंद (हॉकीचे खेळाडू) यांचा दि. २९ ऑगस्ट हा जन्मदिन क्रीडा दिन म्हणून साजरा केला . याप्रसंगी लातूर जिल्ह्याचे जिल्हा नियोजन अधिकारी श्री.सोमनाथ रेड्डी यांनी खेळाडूंना खेळामध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी गुरूमंत्र दिला. याप्रसंगी जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती उज्वला पाटील, म.न.पा.सहाय्यक आयुक्त श्री.रामदास कोकरे, क्रीडा उपसंचालक श्री.युवराज नाईक, क्रीडा भारतीचे श्री.मिलींद डांगे, श्री.विष्णु भुतडा, श्री.राजू कुलकर्णी, ड. महादेव झुंजे पाटील, आदी उपस्थित होते.

कार्यक्रम प्रसंगी जिल्ह्यातील राष्ट्रीय खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक व सन २०२२-२३ आणि २०२३-२४ मधील शालेय स्पर्धांचे प्रोत्साहनात्मक अनुदानाचे वाटप प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.रामेश्र्वर सगरे यांनी केले तर आभार प्रदर्शन राज्य क्रीडा मार्गदर्शक श्री.जयराज मुंढे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठीजिल्हा क्रीडा अधिकारी श्री.जगन्नाथ लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयाचे तालुका क्रीडा अधिकारी श्रीमती सारीका काळे, सुरेंद्र कराड, राज्य क्रीडा मार्गदर्शक जयराज मुंढे, चंद्रकांत लोदगेकर, क्रीडा अधिकारी कैलास लटके, कृष्णा केंद्रे, धीरज बावणे, बाबासाहेब इंगोले, क्रीडा मार्गदर्शक अरवींद चव्हाण, प्रवीण कांबळे, राजेंद्र जाधव, चेतन जावळे, गणेश वंगवाड, तेजस गोरे, प्रसाद वैद्य, स्वप्नील मुळे, यांनी केले.

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ला सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार जाहीर

माजलगाव (प्रतिनिधी)शिर्डी येथे फेडरेशन ऑफ मल्टि-स्टेटद्वारे सहकार गौरव पुरस्कार सोहळा २०२३,दि.८ व ९ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे.



राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट ही संस्था भारतातील सहकार क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांचे शासकीय धोरण ठरवणे व सहकार क्षेत्रात काम करत असताना येणाऱ्या अडचणी राष्ट्रीय स्तरावर मांडण्याचे काम करते.

राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटचे विद्यमान अध्यक्ष श्री सुरेश आण्णा वाबळे तर उपाध्यक्ष श्री अंकलकोटे पाटील हे काम पाहतात.राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट च्या वतीने सहकार चळवळीमध्ये आपले योगदान देणारे व शासनाने निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करून कार्य करणाऱ्या संस्थांचे मूल्यमापन करून संस्थांना विविध पुरस्काराने सन्मानित केले जाते. सण २०२२ ते २३ या आर्थिक वर्षामध्ये २०१ ते ५०० कोटी ठेवी या गटामधून दिला जाणारा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार हा श्री मंगलनाथ मल्टीस्टेट माजलगाव संस्थेस जाहीर झालेला आहे. पुरस्काराचे वितरण दिनांक ९ सप्टेंबर २०२४ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या सहकार परिषदेमध्ये केंद्रीय निबंधक मा. श्री. आनंद कुमार झा यांच्या शुभहस्ते व फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट चे अध्यक्ष मा.श्री.सुरेश आण्णा वाबळे यांच्या उपस्थितीमध्ये वितरित केले जाणार आहे. श्री मंगलनाथ मल्टीस्टेट माजलगाव या संस्थेला यापूर्वी देखील अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले असून श्री मंगलनाथ मल्टी स्टेट ने महाराष्ट्रातच नव्हे तर देशात माजलगाव शहराचे नाव लौकिक केले आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री आर.जी.कानडे यांचे अचूक मार्गदर्शन व व्यवस्थापकीय संचालक ऍड.रवींद्र कानडे यांच्या कौशल्यपूर्ण व्यवस्थापनाने संस्थेने उल्लेखनीय कार्य करत पुरस्काराचा मान संस्थेस प्राप्त केला आहे . मार्च २०२३ अखेर ५४५ कोटी पेक्षा अधिक व्यवसाय पूर्ण केला आहे.केवळ व्यवसाय वाढ हे उद्दिष्ट न ठेवता सुरक्षित व्यवसाय या उद्देशाने १४० कोटी पेक्षा अधिक सुरक्षित सोनेतारण कर्ज वाटप करून सभासदांच्या ठेवींना सुरक्षा देण्याचे काम संस्थेने केले आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रात मंगलनाथ मल्टीस्टेटने एक आदर्श संस्था म्हणून मराठवाड्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

तसेच केवळ व्यवसाय न करता संस्था सामाजिक ,धार्मिक व सांस्कृतिक कार्यात नेहमीच अग्रेसर असते.या सर्व बाबीची दखल घेत राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टिस्टेटने संस्थेला २०२३ चा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार जाहीर केला आहे. संस्थेचे अध्यक्ष आर.जी.कानडे साहेब यांनी सदरील पुरस्कार संस्थेचे संचालक मंडळ, कर्मचारी,नित्यनिधी प्रतिनिधी,ठेवीदार,कर्जदार व हितचिंतक सभासद यांना समर्पित केला आहे.

# हिला सबलीकरणात एसबीआयचे भरीव योगदान जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांचे गौरवोद्गार; भारतीय स्टेट बँकेचा कर्ज वाटप मेळावा

लातूर : महिलांनी स्वत:च्या पायावर उभे राहून आर्थिक स्वावलंबी व्हावे, यासाठी सरकारकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. भारतीय स्टेट बँकेचेही महिला सबलीकरणाच्या कार्यात भरीव योगदान असून महिला बचत गटांना कर्ज पुरवठा करण्यात बँक नेहमीच आघाडीवर राहिली आहे, असे मत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी व्यक्त केले.

भारतीय स्टेट बँकेच्या (स्टेट बँक ऑफ इंडिया) क्षेत्रीय व्यवसाय कार्यालयाच्या वतीने मंगळवारी (दि. २७) कार्निवल रिसॉर्टमध्ये आयोजित कर्ज वाटप मेळाव्याच्या उदघाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, बँकेचे महाव्यवस्थापक अनिरुद्ध कुमार चौधरी, बँकेच्या नांदेडच्या प्रशासकीय कार्यालयाचे उपमहाव्यवस्थापक प्रियाकुमार सरिगाला, लातूरच्या व्यवसाय कार्यालयाचे क्षेत्रीय प्रबंधक अमर सिंह, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक देवकुमार कांबळे यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी ठाकूर म्हणाल्या, ऋऋसर्वच क्षेत्रात महिलांनी स्वतःचे स्थान मजबूत केले आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक साक्षर व स्वावलंबी होऊन स्वतःचा व कुटुंबाचा उत्कर्ष साधावा.ऋऋ श्री. सागर म्हणाले, ऋऋभारतीय स्टेट बँकेने आजच्या मेळाव्यातून बचत गटांना दहा कोटीचे कर्ज वाटप केले आहे. बचत गटांनी आपली उत्पादने बाजारामध्ये आणून त्याचे ब्रँडींग, मार्केटिंग व पॅकेजिंग करण्यासाठी प्रयत्न करावेत. गटांच्या उत्पादनाना वाव मिळावा म्हणून हिरकणी मार्ट सुरू करण्यात आला आहे.ऋऋ श्री. चौधरी यांनी स्टेट बँक सदैव बचत गटांच्या पाठीशी असून गटांनी कर्जाचा उपयोग व्यवसायासाठी करण्याचे आवाहन केले.

# निवळी येथील विविध विकास कामाचा शुभारंभ आ. रमेशआप्पा कराड यांचा ग्रामस्थांशी संवाद

लातूर - लातूर तालुक्यातील मौजे निवळी येथील ३८ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचा भूमिपूजन आणि शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते गुरुवारी सकाळी करण्यात आला यावेळी निवळी येथील ग्रामस्थांशी संवाद साधून शासनाच्या विविध योजना, गावातील विकास कामे यासह विविध विषयावर चर्चा केली.



मौजे निवळी येथील समाज मंदिर ७ लक्ष, अण्णाभाऊ साठे स्टेज शुभारंभ ५ लक्ष, ज्योतिबा मंदिर परिसरातील पेव्हर ब्लॉक ५ लक्ष २० हजार, २ ठिकाणच्या समशानभूमीचे बांधकाम १५ लक्ष, ज्योतिबा मंदिरात आरो फिल्टर २ लक्ष ८० हजार, दलित वस्तीत आरो फिल्टर २ लक्ष ८५ हजार रुपये आदी ३८ लाख रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहाच्या वातावरणात करण्यात आला यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, सांगायो समिती अध्यक्ष वैभव सापसोड, युवा मोर्चाचे सुरज शिंदे, संभाजी वायाळ, काशिनाथ ढगे, विश्र्वास कावळे, निवळीचे सरपंच अभय सोनपेठकर, उपसरपंच राजाराम शिंदे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

निवळी गावात येतात आ. रमेशआप्पा कराड यांनी ग्रामदैवत श्री निळकंठेश्र्वर मंदिरात जाऊन विधिवत पूजा करून दर्शन घेतले. या मंदिर परिसरात तीर्थक्षेत्र विकास योजनेतून मंजूर झालेल्या दोन कोटी रुपये खर्चाच्या येत्या काळात होणाऱ्या विकास कामाची पाहणी केली. निवळी गावातील विविध ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात त्या त्या भागातील ग्रामस्थांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्याशी संवाद साधून विकास कामांना मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

शासनाच्या विविध योजनेची माहिती देऊन या योजनेचा लाभ कोणा - कोणाला मिळाला असे विविध प्रश्र्न विचारून निवळी ग्रामस्थांशी संवाद साधताना आ. कराड म्हणाले की, काँग्रेसच्या सत्तेच्या काळात तोंड बघून योजनेचा लाभ दिला जात होता. भाजपाच्या काळात जो गरीब आहे, जो पात्र लाभार्थी आहे अशा सर्वांना लाभ दिला मिळत असून मागील काळात देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती शासनाने सुरू केलेल्या जलयुक्त शिवार मुख्यमंत्री ग्राम सडक यासह अनेक जनहिताच्या योजना महाविकास आघाडी सत्तेवर येताच बंद केल्या. राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आल्याने लाडकी बहीण यासह अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत या योजना पुढील काळात चालू ठेवण्यासाठी पुन्हा महायुती सत्तेवर येणे गरजेचे आहे असे आ. कराड यांनी बोलून दाखविले.

निळकंठेश्र्वर मंदिराला तीर्थक्षेत्र विकासाचा 'ब' दर्जा मिळवून दिला दोन कोटी रुपयांच्या निधी मंजूर केला भविष्यात आणखी तीन कोटी रुपये मंजूर करून घेवू. उसाच्या टिपऱ्याचे राजकारण यापुढील काळात चालू देणार नाही असे सांगून आपल्या कष्टाचा घामाचा मोबदला मिळत नसेल तर शेतकऱ्यांनीही सक्षम झाले पाहिजे. एफ. आर. पी. प्रमाणे भाव देण्याचे मोदी सरकारने बंधन घातल्यापासून मांजरा परिवाराची रिकव्हरी का कमी झाली, पाण्यात बदल आहे का उसात बदल झाला आहे असा प्रश्र्न उपस्थित करून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, इतर अनेक कारखान्यापेक्षा निवळीसह मांजरा कारखान्याने भाव का कमी दिला पुन्हा त्यात मशीन तोडणी कपात, वजन काट्यावर पाप केले जाते आपल्या न्याय हक्कासाठी शांत राहून चालणार नाही. संघटीत शक्तीतून संघर्ष करावा लागेल.

प्रारंभी सुरज शिंदे यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून झालेल्या विविध विकास कामांची माहिती देऊन जोतिबा मंदिरास तिर्थक्षेत्र विकासाचा 'ब' दर्जा मिळवून द्यावा आणि निवळी गावाचा पोखरा योजनेत समावेश करावा अशी मागणी केली. यावेळी बालाजी नाईकवाडे, भाऊसाहेब भिसे, मारुती माने, विकास शिंदे, मंगेश शिंदे, उद्धव मांयदे, बालाजी गायकवाड, रोहित शिंदे, सुनील मोरे, बालाजी सगर, बिबीशन हिंगले, उद्धव रसाळ, नवनाथ मायंदे, रामलिंग विभुते, महादेव शिंदे, नवनाथ माने, विलास रसाळ, भारत सव्वाशे, बिभीषण मायंदे, गुणवंत पांचाळ, सागर रसाळ, यादव रसाळ, नवनाथ माने, कमलाकर माने, बाबा माने, रमेश ढोकळे, विठ्ठल शिरसागर यांच्यासह महिला पुरुष मोठ्या संख्येने होते.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात बॅडमिंटन स्पर्धा संपन्न

लातूर : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२९ ऑगस्ट २०२४ रोजी अ विभागीय आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करण्यात आली.या स्पर्धेचे उद्घाटन दयानंद शिक्षण संस्थेच्या क्रीडा समितीचे अध्यक्ष ड.आशिष बाजपई यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मंचावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.युवराज सारणीकर,प्रा.महेश बेंबडे,प्रा. नितेश स्वामी,प्रा.भास्कर रेड्डी,प्रा.गोपाळ मोघे,प्रा.अशोक वाघमारे उपस्थित होते.या स्पर्धेमध्ये मुलांच्या गटामध्ये एकूण १४ संघांनी सहभाग तर मुलींच्या गटामध्ये एकूण ११ संघांनी सहभाग नोंदविला.




या स्पर्धेमध्ये मुलींच्या गटामध्ये दयानंद विज्ञान महाविद्यालयाने विजेतेपद प्राप्त केले तर दयानंद कला महाविद्यालयाने उपविजेतेपद प्राप्त केले तसेच दयानंद विधी महाविद्यालयाला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले.मुलांच्या गटांमध्ये महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय,लातूर या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त केला व दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या संघाने उपविजेतेपद प्राप्त केले व दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.सर्व विजयी खेळाडूंचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी, प्राचार्य डॉ. जे.एस.दरगड,प्रभारी प्राचार्य डॉ. एस.एस.बेल्लाळे यांनी अभिनंदन केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.महेश बेंबडे, प्रा.निशिकांत सदाफुले,ऋषिकेश मस्के,सौरभ जांभळे,विनोद गवरे यांनी परिश्रम घेतले.

# अपघात नियंत्रणासाठी प्रशिक्षित वाहनचालक आवश्यक - केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी

अमरावती, (जिमाका): देशामध्ये राष्ट्रीय महामार्ग व



रस्ते बांधणीचे कामे वेगाने सुरु असून वाहतुकीचा वेग वाढला आहे. वाढत्या वेगासोबतच रस्ते अपघातामध्येही लक्षणीय वाढ चिंताजनक आहे. अपघात होण्याचे मुख्य कारण परिपूर्ण प्रशिक्षित नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे रस्ते अपघात कमी करण्यासाठी वाहनचालकांना योग्य प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. अशा प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून उत्तम प्रशिक्षित वाहनचालक निर्माण होऊन अपघात कमी होण्यास निश्र्चित मदत होईल, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

मार्डी रोडवरील प्रादेशिक चालक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, विभागीय परिवहन अधिकारी उर्मिला पवार, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, सिपना शिक्षण प्रसारक मंडळ व प्रादेशिक चालक प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष जगदिश गुप्ता आदी उपस्थित होते.

देशात राष्ट्रीय महामार्ग जलद गतीने तयार होत असून यामुळे पैसा, पर्यावरण व वेळेत बचत होत आहे. वाहतुकीचा वेग वाढल्यामुळे रस्ते अपघातामुळे मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रत्येक ठिकाणी प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्यात येत आहे. यातून प्रशिक्षित वाहनचालक निर्माण करण्याचे धोरण आहे. त्याचाच एक भाग म्हणून येथील प्रादेशिक चालक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आले आहे. हे राज्यातील पहिले केंद्र आहे. या प्रशिक्षण केंद्रामुळे प्रशिक्षित वाहनचालक तयार होतील, असा विश्र्वास केंद्रीयमंत्री नितिन गडकरी यांनी व्यक्त केला.

रस्ता सुरक्षा व अपघात कमी करण्यासाठी केंद्र सरकार उपाययोजना करीत आहे. त्यामध्ये अपघात प्रवण स्थळाचा शोध घेऊन दुरुस्ती करणे, वाहननिर्मिती करणाऱ्या उद्योगांना वाहनामध्ये एअर बॅग, ऑटोमॅटिक ब्रेकींग सिस्टीम, आधुनिक तंत्राचा वापर करुन अपघात नियंत्रण सुविधा निर्माण करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. पेट्रोल, डिझेलला पर्याय म्हणून इलेक्ट्रिक वाहन, सीएनजी, इॅथेनॉल इंधनावर चालणाऱ्या वाहनाचा एक सशक्त व परवडणाऱ्या पर्यायाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. वाहतूक क्षेत्रामध्ये क्रांतिकारक बदल होत आहे. प्रशिक्षित वाहनचालकांना देश-विदेशात २२ लाखापेक्षा जास्त रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे बेरोजगारांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळणार असून देशाच्या विकासाला चालना मिळणार आहे. कौशल्य विकास क्षेत्रात मोठी मागणी असून प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून या संधीचा युवकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. गडकरी यांनी केले.

प्रादेशिक चालक प्रशिक्षण केंद्रामुळे शहराच्या वैभवात भर पडली आहे. या केंद्रामध्ये चांगले प्रशिक्षित वाहनचालक तयार होवून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे. केंद्रीयमंत्री नितिन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली देशात रस्ताचा विकास झपाट्याने होत असून पर्यावरणपूरक इंधनाला ते प्रोत्साहन देत आहे. त्यांच्या या अभिनव उपक्रमामुळे देशाच्या विकासात हातभार लागत असल्याचे डॉ. अनिल बोंडे यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातील केंद्रीयमंत्री श्री. गडकरी यांनी प्रादेशिक चालक प्रशिक्षण केंद्राची पाहणी केली. सिपना शिक्षण प्रसारक मंडळ व प्रादेशिक चालक प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष जगदिश गुप्ता यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. इशांत राजगुरु यांनी केले. तर राखी गुप्ता यांनी आभार मानले.

# दिक्षा पोपलवार यांची यवतमाळ जिल्हा परिषद येथे आरोग्य सेविका पदी निवड

नांदेड - हिमायतनगर तालुक्यातील मौजे सिरंजणी



येथील रहिवाशी असलेल्या व सध्या टेंभी येथील वास्तवास असलेल्या दिक्षा सिद्धार्थ पोपलवार यांची आरोग्य सेविका म्हणून जिल्हा परिषद यवतमाळ येथे निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन केले जात आहे.

दिक्षा पोपलवार यांनी आरोग्य क्षेत्रात आपला ठसा उठवून उल्लेखनीय कामगिरी करण्याचे ध्येय उराशी बाळगले होते. त्यांनी कुठलाही क्लास न करता घर संसार, वैयक्तिक आयुष्यातील अडी अडचणी या सर्वांची सांगड घालत घरीच अभ्यास केला. त्यांचे शिक्षण ए एन एम, बी ए तसेच एम ए पर्यंत झालेले आहे. आपल्या ध्येयाप्रति झपाटलेल्या दिक्षा यांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर आरोग्य सेविका या पदाला गवसणी घातली आहे. याबद्दल त्यांचे सर्वांकडून कौतुक केले जात आहे.

दिक्षा यांचे दोन्ही भाऊ व एक बहीण ही आरोग्य क्षेत्रातच कार्य करत आहेत. डॉ. प्रेम वाघमारे यांनी हिमायतनगर येथे संजीवनी हॉस्पिटल उभारले आहे सोबत दुसरी बहीणही आहे. तसेच दुसरे भाऊ सचिन वाघमारे यांचे स्वतःचे मेडिकल आहे. आई सरोजाबाई व वडील उत्तमराव वाघमारे यांनी अतिशय हलाकीच्या परिस्थितीत काबाड कष्ट करून आपल्या मुलांना शिकवले.दिक्षा पोपलवार यांचे लग्न होऊन सात महिने झाले आहेत.सर्व काही सांभाळत त्या आरोग्य सेविका बनल्या आहेत.

या निवडीबद्दल त्यांचा छोटेखाणी सत्कार करत त्यांना अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी याचे बंधू संजीवनी हॉस्पिटल, हिमायतनगर चे संचालक डॉ. प्रेम उत्तमराव वाघमारे, सिद्धार्थ पोपलवार, नंदकुमार राऊत सवना ,सचिन वाघमारे, तसेच संजीवनी हॉस्पिटल चे मॅनेजर विद्यानंद वाघमारे यांच्यासह आदीजन उपस्थित होते.

**चिन्मात्र ..**

इलेक्शन ड्युटी लागे
बदलूनटाकले रे चित्र
वाव नाही तक्रारीला
अडचणी येई विचीत्र
थकलो शब्द विसरा
विश्रांती ना तिळमात्र
सुविधाअपुऱ्याभल्या
कामातव्यग्र अहोरात्र
अभिनंदनपंचाक्षरांस
कायमठरवता अपात्र
अनेकभूमिका करता
जणूं प्रयोग एक पात्र
उभेराहती भोजनरांगे
हातीधरून भिक्षापात्र
तक्रार मुळी न करावी
वेदना ग्रस्त जरी गात्र
निक्कमकर्मयोगशोभे
चैतन्य रुपांत चिन्मात्र
प्रावृद् नदांत तरतांत
ते निजहिता महा मात्र
जन सेवा सहज घडते
कार्यनक्कीचं रे पवित्र
पुण्य संचय साठविला
नोंदले सार्थक सुचरित्र
–
२

**धडाड् धूम ..**
**(होर्डिंग्ज)**

मोक्यांवर होर्डिंग्ज
कोसळे धडाड् धूम
अप घात घात पात
अधिकारी घामेघूम
चौकशा सुरु केल्या
उधळली रे धामधूम
परवानगी दिली का
मुग गिळून गुमसूम
बिळात लपूनबसले
आरोपी ते सामसूम
बळी जाई हकनाक
गरीब बिचारे मासूम
कुटूंबाचे कपाळाचे
पुसून जाई कुमकूम
अनाधिकृत होर्डिंग्ज
उभारे कसे बेमालूम
चिरीमिरी शांत राही
कसेसोसायचे जुलूम
पैशाचे ओझ्याखाली
थंडपडलेली टामटूम
गुंगूनि गेले फायलीत
बुवा झूमबराबर झूम
मिळणार ना आरोपी
कॅमेरा करा जरी झूम
चक्रे फिरती भराभरा
वरतून येताचं हुकूम
हुकमी एक्का निसटे
तिसरा निसटला धूम

**- हेमंत मुसरीफ पुणे .**
**९७३०३०६९९६.**

# सततच्या खोकल्यापासून होईल सुटका, १० रुपयांचे हे फळ आहे रामबाण, मधुमेहही येईल नियंत्रणात

आजारांना दूर ठेवण्यासाठी मौसमी फळ खाण्याचा सल्ला दिला जातो. थंडीच्या दिवसांत संत्र व पेरू मोठ्या प्रमाणात खाल्ले जातात. तर, संत्री आंबट गोड असतात तर पेरू गोड असतो. हिवाळ्यात ताप, सर्दी- खोकला यांचे प्रमाण वाढते. थंडी असल्याने कोरडा खोकलादेखील खूप वाढतो. पण या दिवसांत पेरू खाणे खूप फायद्याचे आहे. पेरूमध्ये अनेक पोषकतत्वे असतात त्यामुळं थंडीच्या दिवसांत पेरुचे सेवन आवश्यक करावे. हिवाळ्यात पेरु खाणे आरोग्यासाठी चांगले आहे. व्हिटॅमिन-सी आणि फायबरने युक्त असलेल्या पेरूमुळं अनेक आजारांचा धोका कमी होतो.



आरोग्यतज्ज्ञांच्या मते, हिवाळ्यात पेरू खाणे खूप फायद्याचे आहे. यात व्हिटॅमिनची मात्रा भरपुर मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळं रोगप्रतिकार शक्ती वाढते आणि सर्दी-खोकल्यापासून आराम मिळतो. पेरूवर काळे मीठ टाकून खाल्ल्यास शरीरासाठी अधिक लाभकारी ठरते. पेरुमुळे मधुमेहही नियंत्रणात राहतो आणि मधुमेहाचे रुग्णही याचे सेवन करु शकतात. पेरुचे सेवन तुम्ही दिवसभरात कधीही करु शकता. पण शक्यतो रात्रीच्या दिवसात फळांचे सेवन करु नये असा सल्ला दिला जातो.

आरोग्यतज्ज्ञांच्या मते, सर्दी-खोकल्यामुळं हैराण असलेल्या लोकांसाठी पेरू रामबाण ठरु शकतो. सतत फक्त पेरू खाऊन तुम्हाला कंटाळा आला असेल तर सुरुवातीला पेरू गॅसवर चांगल्या पद्धतीने भाजून घ्या नंतर तो स्मॅश करुन त्यात काळे मीठ टाकून सेवन करावे. असे केल्याने खोकल्यापासून लवकर आराम मिळतो. पिकलेल्या पेरुमध्ये काळे मीठ टाकून खाणे औषधाप्रमाणे काम करते आणि खोकल्यापासून लगेचच आराम मिळतो. जर तुम्हाला सतत सर्दी-खोकल्याचा त्रास असतो त्यांनी पेरू शिजवून खावा त्यामुळं शरीराला अनेक फायदे मिळतात.

पेरूचे अन्य फायदे

पेरु खाल्ल्याने बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. कारण यात फायबर मोठ्या प्रमाणात आढळते. फायबरयुक्त पदार्थ खाल्ल्याने पोट स्वच्छ होते. पेरु पोटासाठीही खूप चांगला मानला जातो. अनेक संशोधनात समोर आलं आहे की, पेरू हृदयाच्या आरोग्यासाठीही वरदान आहे. पेरुत पोटॅशियम आणि सोडियमची चांगली मात्रा आहे. ज्यामुळं हाय ब्लड प्रेशर नियंत्रणात ठेवण्यास मदत मिळते. पेरु खाल्ल्याने हाय कोलेस्ट्रॉलदेखील कमी होते. ज्यामुळं हृदय निरोगी राहते आणि हृदयविकाराचा धोका टळतो

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातील मुलींनो व्यावसायिक शिक्षण घ्या मोफत..!

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषी व पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्त्याखालील शैक्षणिक संस्थांद्वारे राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग या प्रवर्गातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतोष्ठ.



व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के इतके मर्यादित आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्या, तसेच महिला सक्षमीकरणांतर्गत आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून मुली वंचित राहू नयेत, ही बाब विचारात घेऊन राज्य मंत्रिमंडळाच्या दि. ५जुलै २०२४ रोजी झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये तंत्रनिकेतने सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (उशर्पीरश्रळूशव अवाळीीळेप झीेलशीी-उअझ) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच, यासाठी येणाऱ्या रु.९०६.०५ कोटी एवढ्या अतिरिक्त आर्थिक भारासही मान्यता देण्यात आली आहे.

शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नूतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेल्या 'संस्थात्मक' व 'संस्थाबाह्य' या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुद्धा अनुज्ञेय आहे.

मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार ईडब्ल्यूएस प्रवर्गास इतर मागास प्रवर्गाप्रमाणे उत्पन्न मर्यादेचे निकष एकसमान करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७१०२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे:

ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करताना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्राऐवजी आई व वडील (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्नावर आधारित सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे. तथापि, जे विद्यार्थी नोकरीत असतील, त्यांच्या आई-वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्यांचे उत्पन्न, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विचारात घेण्यात यावे.

ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षापासून दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

उत्पन्न प्रमाणपत्राबाबतच्या उपरोक्त तरतुदी, 'संस्थात्मक' व 'संस्थाबाह्य' या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुद्धा अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तरी, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या विद्यार्थीनींनी (अर्जाचे नूतनीकरण केलेल्या मुलींसह) या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## त्यांच्या वाणीतून....

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतक महोत्सवानिमित्त मंगळवार, ३ सप्टेंबर २०२४ रोजी भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे.

– उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

## शिवाजी शाळेजवळील सरस्वती कॉलनी परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले नाल्या तुंबल्या असल्या कारणाने डेंग्यूच्या रूग्णांमध्ये वाढ

लातूर : लातूर शहरातील सरस्वती कॉलनी परिसरातील शिवाजी शाळेजवळ मोठ्या प्रमाणात नागरीकांना नागरी समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या ठिकाणी नाल्या नाहीत. रोड नाही. घरातील पाणी बाहेर रस्त्यावरच नागरीकांकडून सोडले जाते. अपार्टमेंटमधील पाणी नाल्या नसल्याकारणाने रस्त्यावरच साचत असून यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली जात आहे. या ठिकाणाहून ये-जा करणार्या नागरीकांना या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. या भागात राहणार्या नागरीकांना या दुर्गंधीचा सामना करावा लागत असुन दुर्गंधीमुळे डेंग्यूचे मच्छरांचे प्रमाण वाढले आहे. या मच्छरांमुळे डेंग्युची लागण अनेक नागरीकांना झाली आहे. वारंवार या भागातील नागरीकांनी नगरसेवकांना भेटूनही त्याचा काही उपयोग होत नाही. कोणी नागरीकांचे म्हणणे ऐकून घेत नाही तसेच लातूर महानगरपालिकेचे उपायुक्त यांना भेटूनही येथील नागरीकांनी निवेदन दिले होते. रस्ते, नाल्या यासाठी पाठपुरावा करूनही कसल्याही प्रकारचा प्रतिसाद या महानगरपालिकेच्या कर्मचार्यांकडून भेटला नाही. या भागातील नागरीक या भागाचे माजी नगरसेवक श्री रवीशंकर जाधव यांना भेटले असता ते अरेरावीची भाषा करतात व तुम्ही या असल्या भागात प्लॉट घेतलाच कशाला?

## (गुरु वचन) मजबूत मन हेच सामर्थ्य

एखाद्या शास्त्रीय नर्तिकेचा अपघातात एक पाय निकामी होऊनही तिची नृत्याची जिद्द कमी होत नाही. ती नकली पाय बसवून व्यासपीठावर नाचते. एखाद्या क्रिकेटपटूने चांगला खेळ केला तरीही त्याला संघाबाहेर जाण्याचा रस्ता दाखविला जातो. परंतु, तो हार न मानता पुन्हा संघात दाखल होतो. एका महान चित्रपट निर्मात्याच्या महत्त्वाकांक्षी चित्रपटाला दर्शकांनी नकार दिल्यानंतर तो पुन्हा एक चित्रपट निर्माण करतो आणि तो चित्रपट इतिहास घडवितो किंवा मैलाचा दगड ठरतो.

असे नेहमीच होते. कारण जगात दोन प्रकारचे लोक असतात. एक म्हणचे कमजोर मनाचे आणि दुसरे म्हणजे मजबूत मन असलेले. कमजोर मन असणाऱ्या लोकांमध्ये संकटाचा सामना करण्याचे धाडस नसते. त्यामुळे ते अधिकधिक कमजोर होऊन तक्रार करणे, रडणे यामुळे अयशस्वी होतात. मात्र आपल्या अपयशाचे खापर दुसऱ्याच्या माथ्यावर फोडण्यासाठी कारणे शोधतात. मजबूत मन असणारे लोक असे नसतात. ते प्रत्येक संकटाचा धैर्याने सामना करतात. टीकाकारांनी केलेली टीका त्यांचे मन बदलू शकत नाही. ते आपली हिंमत गमावत नाहीत, ते तक्रार करत नाहीत. ते प्रत्येक घटनेचा सकारात्मक बाजूने विचार करून एक दिवस यशस्वी होतात. कारण, त्यांच्यामध्ये संकटाच्याकाळी आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षा असते. ते जीवनातील प्रत्येक आव्हानाचा अधिकाधिक फायदा घेण्याचा प्रयत्न करत असतात.

आपण यापैकी कसे आहात आणि कसे बनू इच्छिता, ते ठरविण्याचा अधिकार आपल्याला आहे. कारण, जीवनात प्रत्येकाला एक प्रश्न विचारला जातो तो म्हणजे, आपण साहसी बनू इच्छिता की भित्रे? सकारात्मक विचार करणारा कधीच भित्रा बनू शकत नाही. कारण, त्याचा स्वत:वर, जीवनावर आणि ईश्वरावर विश्वास असतो. ते उच्च विचारशक्ती आणि आत्मविश्वासाने आपले काम करतात. असे लोक आपल्यासाठी काम करतातच पण त्यांच्यामुळे देश आणि समाजाची प्रगती होत असते. असेच लोक देश आणि समाजाची अनमोल संपत्ती असतात. म्हणून नेहमी आपले मन मजबूत ठेवा. कारण, ए. पी. जे. अब्दुल कलाम, धीरूभाई अंबानी, अमिताभ बच्चन आणि सचिन तेंडूलकर या महान लोकांनी जन्म घेतला नसता तर एवढे मोठे कर्म त्याच्या हातून झाले नसते.

## उपदेशकथा कष्टाची बरी भाजी-भाकरी

प्राचीन अरबस्थानात हातिम बिन ताई नावाचा धनिक, कनवाळू, दानशूर आणि परम नीतिमंत म्हणून प्रसिद्ध होता. हातिमताई या नावानेच तो ओळखला जातो. एकदा एका मित्राने म्हटले, 'मला तर अलम दुनियेत तुझ्या तोडीची श्रेष्ठ व्यक्ती दुजी असेल, असं वाटत नाही. तुला तरी असा कुणी भेटला होत का,जो तुला तुझ्याहून श्रेष्ठ वाटला?'

हातिमताईंनी म्हटले,'एकदा मी पवित्र पर्वणीच्या दिवशी अन्नछत्र उघडलं. चाळीस उंट दान केले. कुणाही अतिथीला मुक्तद्वार होतं. माझे आप्तेष्ट नगरीत हिंडून हाकारा-डांगोरा पिटत होते. मी स्वतःसुद्धा भुकेलेल्यांच्या शोधासाठी बाहेर पडलो. वेशीबाहेर मला एक लाकूडतोड्या भेटला. ताज्या छाटलेल्या काटक्यांची मोळी त्याच्या माथ्यावर होती. मी त्याला म्हटलं, भाई हातिमताईच्या अन्नछत्रात जाऊन तू यथेच्छ भोजन का करत नाहीस?'

त्यानं उत्तर दिलं, 'निढळाचा घाम गाळून जो आपली भाकरी कमावू शकतो, त्याला हातिमताईच्या औदार्यानं ओशाळं व्हायची जरुरीच काय? 'मी यावर निरुत्तर झालो. तो लाकूडतोड्या नक्कीच माझ्याहून वरचढ होता.

कथा उपदेश : आशाळभूत होण्यापेक्षा, लाचारी पत्करण्यापेक्षा स्वश्रमाने मिळालेली भाकरी पंचपक्वान्नांहून स्वादिष्ट असते. मनुजाने स्वत्वावर तिलांजली देऊ नये. पृथ्वीचे राज्य त्याचेच आहे!

## राशी भविष्य ३१ ऑगस्ट २०२४

मेष : शुभ रंग: पिवळा: शुभ दिशा: पूर्व
नौकरीमध्ये इच्छे प्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याची शक्यता आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. आपल्या कामाचे कौतुक होईल. फुकटचा मोठेपणा टाळा.

वृषभ : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा:उत्तर
आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याचे योग आहेत. प्रतिष्ठीत व्यक्तिशी संबंध वाढतील. मुलांची प्रगती राहील. जोखमीचे कामे आज करू नका.

मिथुन : शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व
अचानक धन मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायीक वाद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येईल. अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. दुसऱ्याला दुखवू नका.

कर्क : शुभ रंग: निळा शुभ दिशा:उत्तर
कौटुंबिक वातावरण आनंदी राहील, कामामध्ये मन लागणार नाही. स्वाभिमान व अहंकार यामध्ये अंतर राखा. आर्थिक स्थिती बिकट राहील.

सिंह : शुभ रंग:हिरवा,शुभ दिशा: पश्चिम
सामाजिक कार्याची आवड निर्माण होईल. नवीन योजना व्यापारात फायदेशीर राहतील. आपल्या व्यसनांवर नियंत्रण ठेवा.

कन्या : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:पश्चिम
राजकीय कामात अडचणी येतील. अधिकारी वर्गाचा विश्वास संपादन करा. कौटुंबिक समस्यामुळे चिंता राहील.आर्थिक अडचण राहणार आहे.

तुळ: शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम
मित्र व मुलांच्या सहकार्यामुळे उत्साह वाढेल. व्यवसायिक फायदा होईल. मान सन्मानता वाढ होईल. नवीन योजना आखाल. प्रकृतीकडे लक्ष द्या. प्रवास करतांना काळजी घ्या.

वृश्चिक: शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व
मानसिक सुख शांती राहील. भाग्याच्या सहकार्याने आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. कुटुंबाची प्रगती होईल. वहान चालवतांना सतता ठेवा.

धनु: शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व
महत्वाच्या कामाकडे लक्ष द्या. आपल्या कामाची स्तुती झाल्यामुळे आनंदी रहाल. आत्मविश्वास वाढणार आहे. व्यापारिक निर्णय घेण्यास उशीर करू नका.

मकर : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम
योजलेले काम वेळेत पूर्ण होतील. खर्च वाढणार आहे परंतु त्याच प्रमाणे उत्पन्न राहील. प्रत्येक्ष क्षेत्रात मान सन्मान मिळेल. कोणतेही काम जबाबदारीने करा.

कुंभ: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. फायदेशीर व्यवहार राहतील. कौटुंबिक वातावरण चांगले राहिल. समाजात प्रतीष्ठा वाढेल. मशीन वहान सावधपूर्वक हाताळा.

मीन : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम
नवीन कामाचा प्रारंभ आज करू नका. व्यावसायिक स्पर्धेमुळे नुकसान होणार आहे. मुलांच्या रोजगारा संबंधी चिंता राहील. शेजारी, नातेवाईक यांच्याशी संबंध सुधारतील.

## इतिहासात आजचा दिवस ३१ ऑगस्ट

अंतरराष्ट्रीय
१९३९ – हिटलरने पोलीश प्रतिनिधीशी बोलण्याचे नाटक केले. ही बोलणी काही मिनिटेच टिकली. नंतर हिटलरने पोलंडला समझोता करायची इच्छाच नाही, असे जाहीर केले.
१९४१ – उत्तर आफ्रिकेत अलम हल्फा येथे रोमेल आणि ब्रिटिश सैन्यात लढाईची सुरुवात.
१९६३ – रशिया व अमेरिका या देशांदरम्यान हॉट लाईन सुरु करण्यात आली.
१९६८ – सर गॅरी सोबर्सने नॉटिंगहॅम शायरतर्फे खेळतांना एका षटकात सहा षटकार मारले.
१९८३ – इन्सॅट १ – बीने अवकाश फेऱ्या सुरू केल्या.
२००६ – दक्षिण थायलंडमध्ये एकाच वेळी विविध व्यापारी बँकांमध्ये सुमारे १५ बॉम्ब स्फोट झाले. स्फोटात २ लोकांचा मृत्यू आणि १८ लोक जखमी झाले.
२००८ – कॅरेबियन बेटांवर मोठ्या प्रमाणावर नासधूस करीत 'गुस्ताव' या चक्रीवादळाने डोमिनिक गणराज्य, हेती आणि जमैका या देशांनाही लक्ष्य केले. या वादळात ८१ लोकांचा मृत्यू झाला.
राष्ट्रीय
१७९१ – घाशीराम सावळाराम या पुण्याच्या कोतवालाची हत्या.
१९६५ – भारत-पाकिस्तान युद्धाची सुरुवात.
२००४ – गुरू ग्रंथसाहेब ४०० वर्षांचे झाले.
२००६ – विमा काढणे वा विमा कंपनीत नोकरी करणे इस्लाम विरोधी असल्याचा फतवा इस्लामिक शिक्षणसंस्था दारूल उलूम देवबंदने काढला.
२००६ – शिवशंकर मेनन यांची भारताचे नवे परराष्ट्र सचिवपदी नियुक्ती करण्यात आली.
२००६ – गंगा नदीत नाव बुडून २० जण ठार झाले.
२००७ – चिंकारा शिकार प्रकरणात अटकेत असलेल्या चित्रपट अभिनेता सलमान खानला राजस्थान उच्च न्यायालयाने एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.
२००७ – भारतीय नेत्रहीन क्रिकेट संघाने वारेस्टरशायरमधील फेखानम क्रिकेट क्लबमध्ये खेळल्या गेलेल्या पाचव्या व अंतिम एक दिवसीय सामन्यात इंग्लंडचा ६५ धावांनी फज्जा उडवत मालिका ५-० ने जिंकला.
२००७ – मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर विदेशी मैदानावर १० हजार धावा करणारा जगातला पहिला फलंदाज बनला.
जन्म
००१२ – कालिगुला, रोमन स्म्राट.
०१६१ – कोमॉडस, रोमन स्म्राट.
१८४३ – जॉर्ज फोन हर्टलिंग,जर्मनीचा चान्सेलर.
१८७० – मारिया मॉँटेसोरी, इटालियन शिक्षणतज्ज्ञ.
१८८० – विल्हेमिना पहिली, नेदरलँडची राणी.
१९०७ – रमोन मॅग्सेसे, फिलिपाईन्सचा राष्ट्राध्यक्ष.
१९१९ – अमृता प्रीतम, प्रासिद्ध लेखिका,ज्ञानपीठ पुरस्कारविजेत्या.
१९४४ – क्लाइव्ह लॉईड,वेस्ट ईंडीझचे क्रिकेट खेळाडू.
१९६९ – जवागल श्रीनाथ,भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९७२ – क्रिस टकर, अमेरिकन अभिनेता.
निधन
१०५६ – थियोडोरा, बायझेन्टाईन स्म्राज्ञी.
१२३४ – गो-होरिकावा जपानी स्म्राट.
१४२२ – हेन्री पाचवा, ईंग्लंडचा राजा.
१८१४ – आर्थर फिलिप, ब्रिटीश आरमारी अधिकारी.
१९७९ – ई.जे. स्मिथ ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९७३ – ताराबाई मोडक, बालशिक्षणतज्ज्ञ.
१९८६ – उर्हो केक्कोनेन फिनलंडचा राष्ट्राध्यक्ष.
१९९५ –बियंत सिंग, पंजाबचा मुख्यमंत्री

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894